दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

बेकायदा सोन्याच्या खाणीत पाणी शिरलं; 13 कामगारांचा मृत्यू, 13 बेपत्ता

इंडोनेशियाच्या पश्चिम जावा प्रांतात एका अनधिकृत सोन्याच्या खाणीत पाणी शिरल्याने मोठी दुर्घटना घडली आहे. या घटनेत आतापर्यंत 13 कामगारांचा मृत्यू झाला असून, 13 कामगार अजूनही बेपत्ता आहेत. गुरुवारी स्थानिक शोध आणि बचाव पथकाच्या प्रमुख देसियाना कर्तिका बहारी यांनी मृतांचा आकडा जाहीर केला. बेपत्ता कामगारांचा शोध घेण्यासाठी बचाव पथकाला पाणी, अंधार आणि निसरड्या, अरुंद वाटेचा सामना करावा लागत आहे. पोलिसांना या घटनेची माहिती मंगळवारी मिळाली.

राज्यात 174 नव्या डिजिटल सेवांचा शुभारंभ! 26 जानेवारीपर्यंत सरकारी कामकाजात मोठा बदल

राज्यातील शासकीय सेवा आणि योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पारदर्शक, गतिमान आणि मानवी हस्तक्षेप कमीत कमी ठेवून पोहोचविण्यासाठी सुरू असलेल्या प्रशासकीय प्रक्रिया पुनर्रचना (जीपीआर) उपक्रमाला अधिक गती द्यावी. सरकारी कार्यालयात खेटे घालणं, फाईल अडकणं, पुन्हा पुन्हा कागदपत्रं मागणं, हे चित्र आता बदलायचं आहे. येत्या 26 जानेवारीपर्यंत लोकांना डिजिटल पद्धतीने सरकारी सेवा मिळण्याचा वेगळा अनुभव द्यायचा आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज स्पष्ट केलं.

छत्रपती संभाजीनगर ❀ शुक्रवार, दि. २७ नोव्हेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : २१३ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

संसदेचे विशेष अधिवेशन! लोकसभा 30 नोव्हेंबर, तर राज्यसभा 2 डिसेंबरला होणार

नवी दिल्ली : सरकारच्या अत्यावश्यक कामकाजासाठी सभागृहे पुन्हा बोलावण्याची विनंती लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि राज्यसभेचे सभापती सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे करण्यात आली. प्रस्तावानुसार, लोकसभेचे अधिवेशन 30 नोव्हेंबर 2026 रोजी, तर राज्यसभेचे अधिवेशन 2 डिसेंबर रोजी सुरू होणार आहे. 3 डिसेंबर रोजी दोन्ही सभागृहांचे कामकाज संपण्याची शक्यता आहे. संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर पोस्ट करत स्पष्ट केले की, ही बैठक संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या कामकाजाचाच पुढील भाग आहे. मात्र, सभागृहातील कामकाजाच्या गरजांनुसार या कार्यक्रमात बदल होऊ शकतो. या विशेष कामकाजात 'सीमांकन विधेयक, 2026' (Delimitation Bill, 2026) आणि 'घटना (131 वी दुरुस्ती) विधेयक, 2026' यांसारख्या महत्त्वाच्या विधेयकांवर भर दिला जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

वाहन धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याच्या वापरावर बंदी

मुंबई : राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. सर्व महापालिका क्षेत्रांत वाहन धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश महसूलमंत्री तथा दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. गृहनिर्माण सोसायट्यांमध्येही वाहन धुण्यासाठी पिण्याचे पाणी वापरण्यास मनाई करण्यात आली असून, असा प्रकार आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे. पाणीटंचाईची शक्यता लक्षात घेता उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा वापर वाहन धुण्यासारख्या कामांसाठी होऊ नये, यासाठी प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यातील सर्व महापालिका क्षेत्रांत या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी मुख्य सचिवांमार्फत लवकरच शासन आदेश जारी करण्यात येणार आहेत. त्यानंतर महापालिका क्षेत्रांमध्ये संबंधित यंत्रणांना कारवाई करता येणार आहे. हा निर्बंध सार्वजनिक ठिकाणांपुरता मर्यादित नसून, गृहनिर्माण सोसायट्यांच्या आवारातही पिण्याच्या पाण्याने वाहने धुण्यास मनाई असेल. सोसायट्यांमध्ये असा प्रकार सुरू असल्याचे निदर्शनास आल्यास कारवाई केली जाणार आहे. संभाव्य पाणीटंचाई आणि दुष्काळी परिस्थितीचा विचार करून नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहनही बावनकुळे यांनी केले आहे.

नेपाळमधील पुरानंतर 213 भारतीय बेपत्ता; कुटुंबीयांना 2 डिसेंबरपर्यंत यादी तपासण्याचे आवाहन

यादीतील नावांबाबत काही शंका, आक्षेप किंवा दुरुस्ती सुचवायची असल्यास 2 डिसेंबर 2026 पर्यंत माहिती सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

मुंबई : नेपाळमध्ये 26 ऑगस्ट रोजी आलेल्या विनाशकारी पुरानंतर बेपत्ता झालेल्या भारतीय नागरिकांच्या कुटुंबीयांसाठी महत्त्वाची सूचना जारी करण्यात आली आहे. नेपाळमधील भारतीय दूतावासाने बेपत्ता भारतीय नागरिकांची नेपाळी प्रशासनाने प्रसिद्ध केलेली यादी तपासण्याचे आवाहन केले आहे. यादीतील नावांबाबत काही शंका, आक्षेप किंवा दुरुस्ती सुचवायची असल्यास 2 डिसेंबर 2026 पर्यंत माहिती सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

नेपाळच्या राष्ट्रीय आपत्ती जोखीम निवारण आणि व्यवस्थापन प्राधिकरणाने (NDRRMA) बेपत्ता असलेल्या 213 भारतीय नागरिकांची यादी जाहीर केली आहे. बेपत्ता व्यक्तींना कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून अधिकृतरीत्या मृत घोषित करण्याच्या उद्देशाने ही प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

पुरानंतर 1,400 हून अधिक जणांचा मृत्यू : नेपाळमध्ये आलेल्या पुरामुळे मोठी जीवितहानी आणि वित्तहानी झाली होती. या आपत्तीनंतर 1,400 हून अधिक लोकांचा मृत्यू झाल्याची पुष्टी झाली आहे. तर परदेशी नागरिकांसह 5,000 हून अधिक लोक अद्याप बेपत्ता असल्याचे सांगण्यात येत आहे. नेपाळ सरकारने विहित कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर बेपत्ता व्यक्तींना अधिकृतरीत्या मृत घोषित करण्याचा निर्णय घेतला



आहे. या पुरामुळे भोटेकोशी आणि त्रिशूली नद्यांच्या काठावरील पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले. तसेच जवळपास डझनभर जलविद्युत प्रकल्पांनाही फटका बसला.

यादीत नाव असल्यास काय करावे?

NDRRMA ने बेपत्ता भारतीय नागरिकांची यादी सार्वजनिक करून त्यातील तपशिलांमध्ये भर घालणे, नाव वगळणे किंवा माहिती दुरुस्त करण्यासाठी नागरिकांकडून आक्षेप आणि विनंत्या मागवल्या आहेत. काठमांडू येथील भारतीय दूतावासाने बेपत्ता व्यक्तींच्या कुटुंबीयांना यादीचे काळजीपूर्वक पुनरावलोकन करण्याचे आवाहन केले आहे.

यादीतील माहितीबाबत काही चिंता, आक्षेप किंवा सुधारणा सुचवायची असल्यास 2 डिसेंबर 2026 पर्यंत ती सादर करावी, असे दूतावासाने निवेदनात म्हटले आहे.

आक्षेप आणि बदलांच्या मागण्यांची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नेपाळ सरकार अंतिम यादी तयार करेल आणि अधिकृत मृत्यू घोषणा जारी करेल. त्यानंतर संबंधित स्थानिक प्रशासनाकडून मृत्यू प्रमाणपत्रे मिळवण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल. या प्रक्रियेदरम्यान कुटुंबीयांकडून अतिरिक्त माहिती आणि कागदपत्रे मागवली जाऊ शकतात. यासंदर्भात पुढील काही दिवसांत अधिक माहिती दिली जाणार असल्याचे भारतीय दूतावासाने स्पष्ट केले आहे.

12 देशांतील 452 परदेशी नागरिक बेपत्ता : NDRRMA च्या सूचनेनुसार, 12 देशांतील राजनैतिक दूतावासांकडून बेपत्ता झालेल्या 452 परदेशी नागरिकांची पडताळणी केलेली माहिती प्राप्त झाली आहे. यामध्ये 213 भारतीय, 85 चिनी, 69 अमेरिकन, 32 ब्रिटिश आणि 27 कॅनेडियन नागरिकांचा समावेश आहे. याशिवाय सिंगापूरचे 9, दक्षिण आफ्रिकेचे 6, फ्रान्सचे 4, तर हंगेरी, बेल्जियम आणि कझाकस्तानचे प्रत्येकी 2 नागरिक बेपत्ता आहेत. बेलारूसच्या एका नागरिकाचाही या यादीत समावेश आहे.

जास्त साखर, मीठ, फॅट असलेल्या पदार्थांच्या पॅकेटवर असणार खास मार्किंग, सुप्रीम कोर्टाचा महत्त्वपूर्ण निर्देष

नवी दिल्ली: बाजारपेठेतून चिप्स, बिस्किटे, चॉकलेट किंवा कोणतेही पॅकेज्ड फूड खरेदी करताना अनेकदा पाकिटाच्या मागील बाजूला बारीक अक्षरात लिहिलेली माहिती असते, ती माहिती वाचणे कठीण जाते. अनेकदा आपण नकळत "HIGH FAT", "HIGH SUGAR" किंवा "HIGH SALT" असलेले पदार्थ खातो. मात्र, नागरिकांच्या आरोग्याचा विचार करत सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाचा आणि ऐतिहासिक निकाल दिला आहे. न्यायमूर्ती जे. बी. पारदीवाला आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले आहे की, "HIGH FAT", "HIGH SUGAR" किंवा "HIGH SALT" असलेल्या पॅकेज्ड खाद्यपदार्थांच्या पॅकेटच्या पृष्ठभागावर स्पष्ट माहिती देणे आवश्यक आहे. संविधानात आरोग्याच्या अधिकाराचा उल्लेख असून, संविधान दिनाच्या निमित्ताने दिलेला हा निर्णय देशाला निरोगी भविष्याकडे नेणारा ठरेल, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाला (FSSAI) कडक निर्देश दिले आहेत. नवीन आदेशानुसार, चरबी, साखर आणि मीठ या प्रत्येक हानिकारक घटकासाठी स्वतंत्र लाल षटकोनी लेबल लावणे आवश्यक असेल. या लेबल्सवर एक स्पष्ट चित्र आणि ठळक अक्षरांमध्ये "HIGH FAT", "HIGH SUGAR" किंवा "HIGH SALT" हे शब्द असतील. न्यायालयाने असेही नमूद केले की, फुड पॅकेजच्या पुढील पृष्ठभागावर ग्राहकांना वाचायला येईल, या पद्धतीने ते प्रिंट करण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाने लेबलिंगचे निकषही पूर्णपणे बदलले आहेत. आता, FSSAI ला ही चेतावणी केवळ अतिरिक्त साखरेवरच नाही, तर पॅकेजमधील एकूण साखर, सॅच्युरेटेड फॅट आणि मिठाच्या प्रमाणावर आधारित वापरावं लागणार आहे. सर्व वापराबाबतचे मुल्यमापन ठरवण्याचे आदेश न्यायालयाने कंपन्यांना दिलेली आहेत. DGI 2024 मधील तक्ता 15.1 जसाच्या तसा लागू केला जाणार नाही. यापूर्वी सुनावणीदरम्यान, कंपन्यांना नियमांचे स्वेच्छेने पालन करण्यासाठी आणि नव्याने सल्लामसलत करण्यासाठी एक वर्षाची दिवसांची मुदत देण्याच्या FSSAI च्या प्रस्तावावरही न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.

सर्वोच्च न्यायालयाचा हा आदेश पूर्णपणे बंधनकारक आहे. मसुदा नियम तयार करण्यासाठी न्यायालयाने FSSAI ला चार महिन्यांची मुदत दिली असून, यामध्ये कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा दिला आहे. तसेच, या दिशेने किती काम झाले आहे हे पाहण्यासाठी FSSAI ला बरोबर 10 आठवड्यांनंतर न्यायालयात अहवाल सादर करावा लागेल. केवळ पाकिटांवर चेतावणी छापून प्रश्न सुटणार नाही, त्यामुळे मुलांमध्ये जनजागृती करण्यावरही न्यायालयाने भर दिला आहे. देशभरातील शाळांमध्ये पोषण साक्षरता म्हणजेच न्यूट्रिशनल लिट्रेसी लागू करावी लागेल. त्यासाठी शालेय अभ्यासक्रमात बदल करणे आणि विशेष कार्यशाळा घेणे आवश्यक आहे. लहान वयातच योग्य आहाराची जाणीव झाल्यास पुढील पिढी जंक फूडच्या दुष्परिणामांपासून सुरक्षित राहू शकेल, असा विश्वास न्यायालयाने व्यक्त केला आहे.

प्रफुल्ल पटेल यांनी घेतली शरद पवार यांची रुग्णालयात भेट



मुंबई : ज्येष्ठ नेते शरद पवार यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमधील राजकीय हालचालींकडे लक्ष वेधले गेले आहे. पवार यांना रुग्णालयात दाखल केल्याचे समजताच राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी त्यांची भेट घेतली. शरद पवार यांना गुरुवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास ब्रीच कँडी रुग्णालयात आणण्यात आले. सुरुवातीला ते नियमित तपासणीसाठी आल्याचे सांगण्यात आले. मात्र, प्रवासामुळे झालेल्या दगदगीमुळे त्यांना डी-हायड्रेशनचा त्रास झाल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आली. पवार यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले, त्यावेळी शरद पवार गटाच्या प्रमुख नेत्यांची बैठक सुरू होती. या बैठकीला जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, सुप्रिया सुळे, रोहित पवार आणि अनिल देशमुख यांच्यासह अन्य नेते उपस्थित होते. पवार यांना रुग्णालयात दाखल केल्याची बातमी समजताच सुप्रिया सुळे बैठक सोडून तातडीने रुग्णालयात गेल्या. मात्र, रोहित पवार बैठकीतच राहिले. ते रुग्णालयात गेले नसल्याने त्याबाबतही चर्चा सुरू झाली.

सुप्रिया सुळे रुग्णालयात पोहोचल्यानंतर काही वेळाने प्रफुल्ल पटेल यांनीही शरद पवार यांची भेट घेतली. त्यामुळे पवार, सुळे आणि पटेल यांची रुग्णालयातील भेट राजकीय चर्चेचा विषय ठरली. या पार्श्वभूमीवर शरद पवार काही वेगळा राजकीय निर्णय घेणार का, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा एकत्र येणार का, असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. यापूर्वी शरद पवार रुग्णालयात दाखल झाले होते, त्यावेळी प्रफुल्ल पटेल यांनी दुसऱ्या दिवशी त्यांची भेट घेतली होती. त्या वेळीही राजकीय चर्चांना सुरुवात झाली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही फोन करून पवार यांच्या प्रकृतीची विचारपूस केली होती. तुम्ही पक्षाची काळजी न करता आराम करावा, मी आणि सुप्रिया मिळून देश सांभाळतो, असे मोदी यांनी सांगितल्याचा उल्लेखही चर्चेत आला होता.

आता पुरुषांनाही मिळणार 15 दिवसांची पितृत्व रजा! सरकारचा मोठा निर्णय

मुंबई : तामिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांनी गुरुवारी (२६ नोव्हेंबर) पुरुष सरकारी कर्मचाऱ्यांना १५ दिवसांच्या पितृत्व रजेची घोषणा केली आहे. उत्तम पालकत्वासाठी पुरुषांना असा हक्क देण्याची राज्यात ही पहिलीच वेळ आहे. मुलांची काळजी घेणे ही पुरुषांचीही जबाबदारी आणि कर्तव्य आहे आणि त्यानुसार विवाहित पुरुषांना १५ दिवसांची पितृत्व रजा मिळू शकेल, असे सरकारने म्हटले आहे. पुरुषांसाठी नवीन रजा सुविधा लागू करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले असून ही १५ दिवसांची रजा एकतर बाळंतपणाच्या १५ दिवस आधी किंवा बाळाच्या जन्मानंतर सहा महिन्यांच्या आत घेता येईल, असे एका अधिकृत प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

सरकारने सांगितल्यानुसार पुरुषांना पितृत्व रजेची मागणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या निवेदनानंतर हा निर्णय घेण्यात आला असून त्यावर सकारात्मक विचार करण्यात आला आहे. तामिळनाडू सरकारमध्ये कार्यरत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांना सध्या ३६५ दिवसांची प्रसूती रजा दिली जात असताना सरकारी कर्मचाऱ्यांच्या विनंतीनंतर सरकारने पुरुष कर्मचाऱ्यांसाठी पितृत्व रजा सुरू केली आहे. महिला सरकारी कर्मचाऱ्यांना ३६५ दिवसांची प्रसूती रजा देण्याची तरतूद ही मातृत्व आणि बालकाच्या कल्याणला दिले जाणारे महत्त्व दर्शवते, असे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. त्याचप्रमाणे, पुरुष सरकारी कर्मचाऱ्यांना पितृत्व रजा दिल्यास त्यांना कौटुंबिक जबाबदाऱ्या वाटून घेण्यास मदत होईल आणि मुलांच्या संगोपनात वडिलांचा सहभाग सुनिश्चित होईल, असेही त्यात नमूद केले आहे.

'या काळात आईला शारीरिक आणि भावनिक आधार देण्यासाठी तसेच बाळाची काळजी घेण्यासाठी वडिलांचा पाठिंबा अत्यावश्यक असतो. पुरुष सरकारी कर्मचाऱ्यांना पितृत्व रजा दिल्यास कौटुंबिक जबाबदाऱ्या वाटून घेण्यास मदत होईल आणि मुलांच्या संगोपनात वडिलांचा सहभाग सुनिश्चित होईल,' असे मुख्यमंत्री सी जोसेफ म्हणाले.

सौरभ दास यांचा लंडन प्रवास रोखला! CJP च्या तीन नेत्यांविरोधात LOC जारी

मुंबई : मुंबई पोलिसांनी सिटिझन्स फॉर जस्टिस अँड पीस (CJP) या संस्थेचे अध्यक्ष अभिजित दीपके, सौरभ दास आणि आशुतोष रांका यांच्याविरोधात लुक आऊट सर्क्युलर (LOC) जारी केले आहे. गांधी जयंतीच्या दिवशी मुंबईत पूर्वपरवानगीशिवाय आंदोलन केल्याच्या आरोपावरून पोलिसांनी त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणाच्या तपासासाठी तिघांची चौकशी आवश्यक असल्याने त्यांना देशाबाहेर जाण्यापासून रोखण्यासाठी LOC जारी केल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हे LOC चार ते पाच दिवसांपूर्वी जारी करण्यात आले. तपासादरम्यान संबंधित व्यक्तींची चौकशी करण्याची गरज भासू शकते. त्यामुळे त्यांची देशात उपस्थिती आवश्यक असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

या प्रकरणाची माहिती केंद्र सरकारने दिल्ली उच्च न्यायालयात दिली आहे. मुंबई पोलिसांनी CJP चे सह-संयोजक



सौरभ दास यांच्याविरोधात 23 नोव्हेंबर रोजी LOC जारी केले होते. त्यामुळे त्यांना लंडनला जाण्यापासून दिल्ली विमानतळावर रोखण्यात आल्याचे न्यायालयात सांगण्यात आले. केंद्र सरकारच्या वकिलांनी सुनावणीदरम्यान सांगितले की, सौरभ दास यांना या संदर्भात कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. मात्र, त्यांनी अद्याप त्याला उत्तर दिलेले नाही. दुसरीकडे, दास यांच्या वकिलांनी न्यायालयात असा युक्तिवाद केला की, त्यांच्या अशिलाला LOC जारी केल्याची माहिती देण्यात आली नव्हती. तसेच ते जारी करण्यामागील कारणही स्पष्ट करण्यात आले नव्हते.

सौरभ दास यांनी दाखल केलेल्या याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठातील एका कार्यक्रमात 'झुरळांची चळवळ' या विषयावर बोलण्यासाठी ते ब्रिटनला जाणार होते. मात्र, 23 नोव्हेंबरच्या रात्री लंडनला जाणाऱ्या विमानात बसण्यापूर्वी दिल्ली विमानतळावर आपल्याला थांबवण्यात आल्याचा दावा त्यांनी याचिकेत केला आहे.

या प्रकरणाची पुढील सुनावणी 9 डिसेंबर रोजी होणार आहे. LOC जारी करण्यामागील कारणे आणि त्यासंदर्भातील कायदेशीर बाबींवर न्यायालयात पुढील सुनावणीदरम्यान चर्चा होण्याची शक्यता आहे.

सोने आणि चांदी खरेदी करण्याचा विचार करत असाल, तर थोडं थांबा!

मुंबई : भारतीय सराफा बाजारात सोने आणि चांदीच्या दरांकडे सध्या ग्राहकांचे लक्ष लागले आहे. लग्नसराई, सणासुदीचे दिवस किंवा गुंतवणुकीच्या दृष्टीने सोने-चांदी खरेदी करण्याचा विचार करत असाल, तर आजचे बाजारभाव जाणून घेणे महत्त्वाचे आहे. गुरुवार, 26 नोव्हेंबर रोजी सोन्या-चांदीच्या किमतींमध्ये चढ-उतार पाहायला मिळत आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडींचा परिणाम देशांतर्गत सराफा बाजारावरही होत असल्याने ग्राहकांना दरातील बदलांचा सामना करावा लागत आहे. मुंबईतील उपलब्ध बाजारभावानुसार, 26 नोव्हेंबर रोजी 24 कॅरेट सोन्याचा दर प्रति 10 ग्रॅम 1,23,060 रुपये, तर 22 कॅरेट सोन्याचा दर प्रति 10 ग्रॅम 1,17,080 रुपये नोंदवण्यात आला आहे.

कंत्राटी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा, 10 वर्षांच्या सेवेनंतर कायम नियुक्तीचा मार्ग मोकळा

मुंबई : गोव्यात सलग 10 वर्षे कंत्राटी पद्धतीने सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांना सरकारी सेवेत नियमित करण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली आहे. 'गोवा (कंत्राटी कर्मचारी सेवा नियमितीकरण) नियम, 2026' अंतर्गत नियमित नियुक्ती आदेशाचा अधिकृत नमुना निश्चित करण्यात आला आहे. कार्मिक खात्याने यासंदर्भात परिपत्रक जारी केले असून, नियमितीकरणासाठीची प्रक्रिया आणि अटी स्पष्ट केल्या आहेत. कार्मिक खात्याने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, हे नियम 3 सप्टेंबर 2026 पासून लागू झाले आहेत. या तारखेला संबंधित पदावर सलग 10 वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना या नियमांचा लाभ मिळू शकतो. मात्र, केवळ 10 वर्षांची सेवा पूर्ण केली म्हणून कर्मचाऱ्यांना आपोआप कायमस्वरूपी नियुक्ती मिळणार नाही.

नियम 3 मधील तरतुदीनुसार, संबंधित कर्मचाऱ्याच्या नियमित नियुक्तीचा आदेश मुख्यमंत्र्यांच्या मंजुरीनंतरच जारी करता येणार आहे. त्यामुळे प्रत्येक प्रकरणात मुख्यमंत्र्यांची मान्यता महत्त्वाची असेल.

सर्व सरकारी विभागांमध्ये नियमितीकरणाची प्रक्रिया एकसमान पद्धतीने पार पडावी, यासाठी कार्मिक खात्याने नियुक्ती आदेशाचा अधिकृत नमुना तयार केला आहे.





दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

दुष्काळ अग्रीम मदत वितरणाचा वेग आणि फार्मर आयडीची अनिवार्यता

दुष्काळाच्या झळांनी होरपळणाऱ्या राज्यातील बळीराजाला तातडीचा आर्थिक दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने राबवलेली दुष्काळ अग्रीम मदत योजना आता प्रत्यक्ष फळाला येऊ लागली आहे. राज्यातील ३१० दुष्काळग्रस्त तालुक्यांमधील तब्बल ९६ लाख ४८ हजार ४८९ शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत थेट ४ हजार ८२४ कोटी २४ लाख रुपये जमा झाल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली आहे. संकटाच्या काळात मध्यस्थांची साखळी मोडून काढत प्रत्येक पात्र शेतकऱ्याच्या खात्यात थेट पाच हजार रुपयांचे अर्थसाहाय्य जमा करणे, हे प्रशासकीय गतिमानतेचे आणि पारदर्शक कारभाराचे स्वागतार्ह उदाहरण म्हणावे लागेल. विभागनिहाय आकडेवारीवर नजर टाकल्यास, दुष्काळाच्या सर्वाधिक झळा सोसणाऱ्या मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर विभागाला सर्वाधिक म्हणजेच ३४.९३ लाख शेतकऱ्यांना १,७४६.९६ कोटी रुपयांची मदत मिळाली आहे. त्याखालोखाल नाशिक (१,०३०.८९ कोटी), पुणे (८०२.७६ कोटी), अमरावती (७९१.८१ कोटी), नागपूर (४१३.९८ कोटी) आणि कोकण (३७.८४ कोटी) विभागांतील शेतकऱ्यांनाही या मदतीचा मोठा आधार मिळाला आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडून मंजूर झालेल्या ९८ लाख २१ हजार २३ शेतकऱ्यांपैकी बहुतांश शेतकऱ्यांपर्यंत निधी पोहोचला असला, तरी अद्याप सुमारे पावणेदोन लाख शेतकरी तांत्रिक अडचणींमुळे या लाभापासून वंचित आहेत. एकही पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, ही मंत्र्यांची ग्वाही बळीराजाला आश्वस्त करणारी असली, तरी प्रशासनाने ही तांत्रिक दिरंगाई युद्धपातळीवर दूर करणे गरजेचे आहे. या संपूर्ण प्रक्रियेने कृषी क्षेत्रातील डिजिटल परिवर्तनाचे, विशेषतः 'ॲग्रीस्टॅक' (AgriStack) आणि 'फार्मर आयडी'चे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे. भविष्यातील सर्व कृषी आणि शासकीय योजनांचे लाभ थेट आणि अचूकपणे मिळण्यासाठी शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी असणे अनिवार्य बनले आहे. त्यामुळे केवळ प्रशासनावर अवलंबून न राहता, ज्या शेतकऱ्यांची फार्मर आयडीची प्रक्रिया अद्याप अपूर्ण आहे, त्यांनी ती तातडीने पूर्ण करून घेणे आवश्यक आहे. दुसरीकडे, ग्रामीण भागातील तांत्रिक अज्ञानामुळे कोणत्याही गरजू शेतकऱ्याचे नुकसान होऊ नये, यासाठी महसूल आणि कृषी विभागाने गावपातळीवर विशेष शिबिरे घेऊन ही प्रक्रिया सुलभ करावी. शासनाची इच्छाशक्ती आणि शेतकऱ्यांची जागरूकता यांचा मेळ बसला, तरच दुष्काळ निवारणाचा हा उपक्रम खऱ्या अर्थाने यशस्वी ठरेल.

टंचाई निवारण होणार सुकर

राज्यात 'एल-निनो'च्या प्रभावामुळे सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान झाल्याने दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई आतापासूनच जाणवत आहे. आगामी काळात पाणीटंचाई अधिक तीव्र होण्याची शक्यता लक्षात घेऊन, टंचाईग्रस्त भागात तातडीने आणि प्रभावी उपाययोजना राबविण्यासाठी राज्य शासनाने पाणीपुरवठ्याच्या विविध उपाययोजनांच्या आर्थिक मर्यादित वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांना विविध पाणीपुरवठा उपाययोजनांसाठी प्रशासकीय मंजुरी देताना वाढीव आर्थिक अधिकार उपलब्ध होणार असून, टंचाई निवारणाच्या कामांना गती मिळणार आहे. याविषयाची माहिती जाणून घेऊ या.

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने 18 नोव्हेंबर 2026 रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी यापूर्वी निश्चित करण्यात आलेल्या आर्थिक मर्यादांना 30 जून 2027 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महसूल मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली गठित मंत्रिमंडळ उपसमितीच्या 4 नोव्हेंबर रोजी झालेल्या बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात आला होता.

पाणीटंचाई निवारणासाठी क्षेत्रीय स्तरावर तातडीने निर्णय घेता यावेत आणि प्रशासकीय प्रक्रियेमुळे उपाययोजनांना विलंब होऊ नये, यासाठी शासनाने जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांच्या आर्थिक अधिकारांमध्ये वाढ केली आहे. वाढीव आर्थिक मर्यादेमुळे टंचाईग्रस्त गावांमध्ये आवश्यक पाणीपुरवठा सुविधा निर्माण करणे, विद्यमान योजनांची दुरुस्ती करणे आणि पर्यायी व्यवस्था उभारणे अधिक सुलभ होणार आहे.

तात्पुरत्या पूरक नळ योजनांना प्राधान्य

पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये विद्यमान पाणीपुरवठा व्यवस्था अपुरी पडत असल्यास, तात्पुरत्या पूरक नळ पाणीपुरवठा योजना उभारण्याचा पर्याय उपलब्ध होणार आहे. अशा योजनांमुळे आवश्यक त्या ठिकाणी पर्यायी जलस्रोतांचा वापर करून पाणीपुरवठा व्यवस्था कार्यान्वित करता येईल. या योजनांसाठी जिल्हाधिकारी ४० लाख रुपयांपर्यंत, तर विभागीय आयुक्त १ कोटी रुपयांपर्यंत प्रशासकीय मंजुरी देऊ शकतील.

नळ पाणीपुरवठा योजनांच्या दुरुस्तीला गती

ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये पाणीपुरवठा योजना अस्तित्वात असल्या, तरी तांत्रिक बिघाड, पाइपलाइनमधील गळती, पंप यंत्रणेतील दोष किंवा अन्य कारणांमुळे पाणीपुरवठा विस्कळीत होतो. अशा योजनांची विशेष दुरुस्ती वेळेत झाल्यास उपलब्ध जलस्रोतांचा अधिक प्रभावी वापर करता येईल आणि गावांमधील पाणीटंचाई कमी करण्यास मदत होईल.

या विशेष दुरुस्ती कामांसाठी जिल्हाधिकाऱ्यांना ६० लाख रुपयांपर्यंत, तर विभागीय आयुक्तांना १ कोटी रुपयांपर्यंत आर्थिक मंजुरीचे अधिकार देण्यात आले आहेत. त्यामुळे तांत्रिक अडचणींमुळे बंद पडलेल्या किंवा अपुऱ्या क्षमतेने सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनांच्या दुरुस्तीला गती मिळणार आहे.

टँकरसाठी हायड्रंटची व्यवस्था

टंचाईग्रस्त भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा करताना टँकर भरण्यासाठी योग्य ठिकाणी पाणी उपलब्ध असणे आवश्यक आहे. यासाठी पिण्याच्या पाण्याचे टँकर भरण्यासाठी आवश्यक तात्पुरत्या हायड्रंटची व्यवस्था करण्याची तरतूद शासनाने केली आहे. या उपाययोजनेसाठी जिल्हाधिकारी १ लाख रुपयांपर्यंत, तर विभागीय आयुक्त २ लाख रुपयांपर्यंत खर्चास मंजुरी देऊ शकतील. टँकर भरण्याची व्यवस्था सुलभ झाल्यास पाणी वितरण प्रक्रियेतील वेळ कमी होऊन टंचाईग्रस्त भागात पाणीपुरवठा अधिक नियमित करण्यास मदत होईल.

बैलगाडीने पाणीपुरवठ्याचीही तरतूद

दुर्गम भागातील वाड्या-वस्त्यांमध्ये, जेथे टँकर पोहोचणे कठीण आहे किंवा अन्य पर्याय उपलब्ध नाहीत, अशा ठिकाणी बैलगाडीने पाणीपुरवठा करण्याची उपाययोजनाही शासन निर्णयात कायम ठेवण्यात आली आहे. यासाठी प्रति दिन, प्रति बैलगाडी ३ हजार रुपयांपर्यंत आर्थिक मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत पिण्याचे पाणी पोहोचविण्यासाठी स्थानिक परिस्थितीनुसार या पर्यायाचा वापर करता येणार आहे.

टंचाई निवारणाला बळ

पाणीटंचाईच्या काळात नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे. त्यासाठी केवळ दीर्घकालीन जलस्रोत निर्मितीच नव्हे, तर तात्पुरत्या उपाययोजना, विद्यमान योजनांची दुरुस्ती, टँकरद्वारे पाणीपुरवठा आणि दुर्गम भागांपर्यंत पाणी पोहोचविण्याची व्यवस्था यांचीही आवश्यकता असते. आर्थिक मर्यादित वाढ केल्यामुळे क्षेत्रीय प्रशासनाला परिस्थितीनुसार अधिक तत्परतेने निर्णय घेता येणार आहे. प्रशासकीय मंजुरीच्या प्रक्रियेत सुलभता निर्माण झाल्यामुळे टंचाईग्रस्त गावांमध्ये आवश्यक कामे वेळेत सुरू करण्यास मदत होईल. वाढीव आर्थिक अधिकारांचा प्रभावी वापर, पाणीपुरवठा यंत्रणांचे नियोजन आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यांमधील समन्वयातून ग्रामीण भागातील नागरिकांना पाणीटंचाईच्या काळात दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

- **माहिती संकलन**
जिल्हा माहिती कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर

ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी गावपातळीवर उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या सोडवाव्यात; आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवावा – जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.

छत्रपती संभाजीनगर, दि. 26 (जिमाका) - ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी केवळ कार्यालयीन कामकाजापुरते मर्यादित न राहता गावपातळीवर प्रत्यक्ष उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या समजून घ्याव्यात व त्यांचे निराकरण करावे. ज्या गावांमध्ये स्वतंत्र कार्यालयाची सुविधा उपलब्ध नाही, तेथे ग्रामपंचायत कार्यालयातील स्वतंत्र खोली अथवा गावातील चावडी, सभागृह यांसारख्या उपलब्ध जागांचा वापर करून नागरिकांना सेवा द्यावी. अधिकाऱ्यांची गावातील प्रत्यक्ष उपस्थिती वाढल्यास नागरिकांच्या अनेक अडचणी दूर होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने आज वंदे मातरम् सभागृह येथे " मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांची " एकदिवसीय विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी जनार्धन विधाते, उपविभागीय अधिकारी व्यंकट राठोड तहसीलदार शिवानंद बिडवे, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) एकनाथ बंगाळे,यांच्यासह तहसीलदार, मंडळ अधिकारी तलाठी, ग्राम महसूल अधिकारी,कर्मचार्यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी जनार्धन विधाते यांनी संविधान दिनानिमित्त उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांसमवेत भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. यावेळी संविधानातील मूल्ये व तत्त्वांचे स्मरण करून देण्यात आले.

कार्यशाळेत मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी म्हणाले की, पीक पाहणीच्या कामात नेटवर्क उपलब्ध नसल्याची अडचण अनेकदा मांडली जाते. मात्र, पीक पाहणीसाठी ऑफलाइन सुविधेचाही वापर करता येतो. नेटवर्क नसलेल्या भागातही जीपीएसच्या मदतीने पीक पाहणी करता येते. त्यामुळे नेटवर्कच्या अडचणींचे कारण पुढे न करता उपलब्ध तांत्रिक सुविधांचा योग्य वापर करून कामे वेळेत पूर्ण करावीत.

शासकीय सेवेत काम करताना नागरिकांच्या वाढत्या अपेक्षा आणि प्रशासकीय जबाबदाऱ्या लक्षात घेणे आवश्यक आहे. समाजाच्या गरजा आणि नागरिकांच्या मागण्या सातत्याने वाढत आहेत. त्यामुळे कामाचा व्यापही वाढणार आहे. अशा परिस्थितीत कोणते काम कशा पद्धतीने आणि कमी वेळेत प्रभावीपणे पूर्ण करता येईल, यासाठी प्रत्येकाने स्मार्ट पद्धतीने काम करण्याची गरज आहे, असे त्यांनी सांगितले.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे आवाहन करताना जिल्हाधिकारी म्हणाले की, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हे कामकाज सुलभ करणारे महत्त्वाचे साधन आहे. पत्रांचे मसुदे तयार करणे, पंचनामे, अहवाल आणि इतर नियमित प्रशासकीय कामांचे प्रारूप तयार करण्यासाठी एआयचा उपयोग करता येतो. यासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी स्वतः वेळ देऊन या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण घ्यावे. योग्य माहिती व आवश्यक तपशील देऊन एआयचा वापर केल्यास दैनंदिन कामकाजाचा वेळ वाचून कार्यक्षमता वाढू शकते.

मनुष्यबळाच्या कमतरतेबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, गावपातळीवरील कामकाजासाठी कोतवाल आणि पोलीस पाटील यांची भरती प्रक्रिया सुरू असून, येत्या दोन ते तीन महिन्यांत ही प्रक्रिया पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे सध्या जाणवणारी मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यास मदत होईल. उपलब्ध मनुष्यबळाचा योग्य समन्वय साधून कामकाज सुरळीत ठेवावे, असेही त्यांनी निर्देशित केले.

कार्यशाळेत गाव नमुना क्रमांक 1 ते 8 ऑनलाइन अद्ययावत करणे, ई-फेरफार प्रणालीतील प्रलंबित फेरफार निकाली काढणे, ॲग्रीस्टॅक शेतकरी ओळखपत्राची (Farmer ID) मंजुरी पूर्ण करणे, ओडीसी अहवालातील प्रलंबित बाबींची पूर्तता करणे, ई-पीक पाहणीतील प्लॉट मंजुरीची कामे पूर्ण करणे तसेच इतर अनुषंगिक कामकाजाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी आगामी काळातील संभाव्य दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देण्याचेही आवाहन केले. पाणी साठवण क्षमता वाढविणाऱ्या कामांमुळे भविष्यातील पाणीटंचाईवर उपाययोजना करण्यास मदत होईल, तसेच स्थानिक नागरिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. त्यामुळे प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने संवेदनशीलतेने काम करून नागरिकांच्या प्रश्नांना तातडीने प्रतिसाद द्यावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यशाळेच्या माध्यमातून ऑनलाइन महसूल कामकाजातील अडचणी, तांत्रिक सुविधांचा वापर आणि गावपातळीवरील सेवा अधिक प्रभावी करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

परभणीत आजपासून रंगणार राज्यस्तरीय शालेय तिरंदाजी स्पर्धा

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी, : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, परभणी यांच्या वतीने राज्यस्तरीय शालेय तिरंदाजी क्रीडा स्पर्धेला आजपासून जिल्हा क्रीडा संकुल, परभणी येथे येथे सुरुवात होत आहे. तीन दिवस चालणाऱ्या या क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवार, दि. 27 नोव्हेंबर रोजी सकाळी 11 वाजता जिल्हा क्रीडा संकुल, परभणी येथे आयोजित करण्यात आले आहे. तीन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत राज्यातील 14 वर्षांखालील मुले व मुली तिरंदाजांमध्ये कौशल्यपूर्ण व चुरशीच्या लढती रंगणार आहेत. या राज्यस्तरीय स्पर्धेत नागपूर, अमरावती, लातूर, कोल्हापूर, मुंबई, पुणे, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या राज्यातील आठ विभागांतील सुमारे 250 खेळाडू सहभागी होणार आहेत. विविध विभागांतील युवा तिरंदाजांना आपले कौशल्य, अचूकता, एकाग्रता व क्रीडाक्षमता प्रदर्शित करण्यासाठी या स्पर्धेच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कल्याण पोले यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य क्रीडा मार्गदर्शक संजय मुंढे, परभणी जिल्हा आर्चरी असोसिएशनचे सचिव मधुकर क्षीरसागर, तालुका क्रीडा अधिकारी मिलिंद साळवे, क्रीडा अधिकारी रोहन औंढेकर, सुयश नाटकर, सदानंद सवळे, गजानन तुडमे, मथुरा काथार, प्रकाश पंडित, धिरज नाईकवाडे, योगेश आदमे आदी अधिकारी व कर्मचारी परिश्रम घेत आहेत. या राज्यस्तरीय स्पर्धेचा आनंद घेण्यासाठी परभणी जिल्ह्यातील जास्तीत जास्त क्रीडाप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी कल्याण पोले यांनी केले आहे.

सुशिक्षितांमधील अविद्या अधिक घातक - डॉ. डी. एस. काठे

महात्मा फुलेंच्या अर्थनीतीवर व्याख्यान; संविधान दिनानिमित्त उद्देशिकेचे सामूहिक वाचन

छत्रपती संभाजीनगर, दि. 26 (जिमाका) - श्रमाला प्रतिष्ठा आणि शिक्षणाला संपत्ती मानणारे महात्मा जोतीराव फुले यांचे विचार आजही तितकेच महत्त्वाचे आहेत. केवळ पदवी मिळविणे म्हणजे खऱ्या अर्थाने शिक्षित होणे नव्हे, तर आर्थिक व्यवहारांचे ज्ञान, सामाजिक जाणीव आणि संविधानाची समज असणेही आवश्यक आहे. सुशिक्षित व्यक्तीही फसव्या आर्थिक योजनांना बळी पडत असतील, तर ही सुशिक्षित समाजातील अविद्या अधिक घातक आहे. सक्षम आणि अर्थसाक्षर नागरिक हाच देशाच्या विकासाचा भक्कम पाया ठरतो, असे प्रतिपादन उद्योजक, अभियंता तथा अर्थविषयक अभ्यासक डॉ. डी. एस. काटे यांनी केले.

महात्मा जोतीराव फुले द्विजन्मशताब्दी वर्ष आणि संविधान दिनानिमित्त समर्थनगर येथील शासकीय विभागीय ग्रंथालयात 'महात्मा फुलेंची अर्थनीती – श्रमाला प्रतिष्ठा, शिक्षणाला संपत्ती' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या वेळी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. काटे बोलत होते.

महात्मा फुले यांनी सुमारे दीडशे वर्षांपूर्वी अविद्येचे स्वरूप स्पष्ट करताना शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले होते. श्रम केल्याशिवाय मनुष्याला प्रतिष्ठा प्राप्त होऊ शकत नाही, हा त्यांचा विचार आजही मार्गदर्शक आहे. पैसे दामदुप्पट करण्याचे प्रलोभन दाखविणाऱ्या फसव्या योजनांपासून सावध राहण्यासाठी आर्थिक साक्षरता आवश्यक आहे. तसेच, शेतकऱ्यांनी शेतीसोबत व्यापाराचे कौशल्यही आत्मसात केले पाहिजे. शेतकरी व्यापारातील कौशल्ये शिकल्याशिवाय शेती क्षेत्राला अपेक्षित प्रगती साधता येणार नाही, असेही डॉ. काटे यांनी नमूद केले. संविधानाची माहिती आणि त्यातील मूल्यांची जाणीव असणे हा सुजाण नागरिकत्वाचा महत्त्वाचा आधार असल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संविधान दिनानिमित्त भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. यावेळी शासकीय विभागीय ग्रंथालयात उपलब्ध असलेली भारतीय संविधानाची मूळ प्रत उपस्थितांना अवलोकनासाठी ठेवण्यात आली होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक ग्रंथालय संचालक तथा जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील हुसे होते. प्रमुख अतिथी म्हणून पी. यू. जैन विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय पाटोदी उपस्थित होते. यावेळी महानायक सोशल वेल्फेअर फाउंडेशनच्या 'उडान' मासिकाच्या 'एक्सप्लोअर छत्रपती संभाजीनगर' या दिवाळी अंकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमास ज्येष्ठ साहित्यिक तथा मंडळ कृषी अधिकारी निवृत्ती जोरी, लेखिका छाया महाजन, देवगिरी हायस्कूलचे शिक्षक श्री. कोलते व श्रीमती जाधव, प्रा. सागर चाबुकस्वार, प्रा. अजाबराव मनवर, राहुल वाघमारे, मॉडर्न कॉलेजचे प्राचार्य नामदेव सानप यांच्यासह पी. यू. जैन व देवगिरी हायस्कूलचे विद्यार्थी, ग्रंथालयाचे वाचक, सभासद आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.

प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव यांनी केले. सूत्रसंचालन तांत्रिक सहाय्यक गोविंद खेडकर यांनी केले, तर आभार ग्रंथालय निरीक्षक आवजी गलांडे यांनी मानले.

पोलीस व त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी आवश्यक निर्णय घेणार- मुख्यमंत्री

मुंबई : पोलीस अधिकारी-कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी राज्य शासनाने विविध निर्णय घेतले आहेत. भविष्यातही नियम व कायद्याच्या चौकटीत पोलिसांचा स्वतंत्रपणे विचार करून आवश्यक निर्णय घेतले जातील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया येथे महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेने आयोजित केलेल्या २६/११ दहशतवादी हल्ल्यातील तसेच पहलगाम येथील शहीद जवान आणि निरपराध नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्याच्या कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी त्यांनी पोलीस कुटुंबांसाठी संघटनेने उपलब्ध करून दिलेल्या सुसज्ज रुग्णवाहिकेचे लोकार्पण केले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, २६ नोव्हेंबर हा संविधान दिन असून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्राला अर्पण केलेल्या संविधानाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस आहे. त्याचबरोबर मुंबईवरील २६/११ च्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी, जवान आणि नागरिकांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचाही हा दिवस आहे. २६/११ चा हल्ला हा केवळ ताज हॉटेल, ट्रायडेंट किंवा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवरील हल्ला नव्हता, तर तो भारताच्या सार्वभौमत्वावर आणि संविधानावर केलेला हल्ला होता. पोलीस आणि सुरक्षा दलातील जवानांनी अतुलनीय शौर्याने दहशतवाद्यांचा मुकाबला केला. शहीद तुकाराम ओंबळे यांनी प्राणांची पर्वा न करता कसाबला जिवंत पकडल्यामुळे पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाचा चेहरा जगासमोर आला, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. भारताच्या जवानांवर किंवा नागरिकांवर होणारा कोणताही हल्ला सहन केला जाणार नाही, हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने कृतीतून दाखवून दिल्याचेही त्यांनी सांगितले.

शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घ्यावा : जिल्हाधिकारी

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी: केंद्र व राज्य शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना फार्मर आयडी (शेतकरी ओळखपत्र) अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांनी अद्याप फार्मर आयडी काढलेला नाही, त्यांनी तातडीने ॲग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करून शेतकरी ओळखपत्र प्राप्त करावे. केवळ फार्मर आयडी नसल्यामुळे शासकीय योजनांच्या लाभापासून शेतकरी वंचित राहू नयेत, असे आवाहन जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांनी आज येथे केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीसय निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) विकास जगदाळे, पशुसंवर्धन विभागाचे सहायक आयुक्त जगन सोळंके, जिल्हा अग्रणी बँकेचे रामचंद्र आकुलवार, वनामकृविचे डॉ. गजानन गडदे, मत्स्य विकास विभागाचे सहायक आयुक्त अजित सुरवसे,तसेच तालुका कृषी अधिकारी जी. एल. कोल्हे, एस.पी. भालेराव, एन. जी. घुगे आदी उपस्थित होते.

डिजीटल ॲग्रीकल्चर मिशन अंतर्गत ॲग्रीस्टॅक प्रकल्पाच्या अनुषंगाने ॲग्रीस्टॅक डेटाच्या 100% उपयोग सुनिश्चित करण्यासाठी व शेती क्षेत्रातील विविध समस्यांवर क्षेत्रीय स्तरावरुन नाविन्यपूर्ण डिजीटल उपाययोजना विकसीत करण्यासाठी जिल्हास्तरीय कृती दल गठीत करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने जिल्हास्तरीय आढावा बैठकीत विविध विभागांचा आढावा घेतला.

पीएम किसान सन्मान निधी योजनेसह केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री पीक विमा योजना, पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमायोजना, किसान क्रेडीट कार्ड, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, राष्ट्रीय कृषी विकास योजनेसह विविध योजनांचा लाभ मिळविण्यासाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी आणि फार्मर आयडी महत्त्वाचे ठरत आहेत.

तसेच राज्य शासनाच्या कृषी यांत्रिकीकरण योजना, मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना, मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना - वैयक्तिक शेततळे, आरकेव्हीवाय प्लास्टिक अस्तरीकरण शेततळे योजना, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना, पर्जन्याधारित क्षेत्र विकास कार्यक्रम, पीएमआरकेव्हीवाय -पर्जन्याधारित क्षेत्र विकास योजना, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना, काजू कलम वाटप योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, कृषी यांत्रिकीकरण उपअभियान, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना, राष्ट्रीय कृषी विकास योजना ई-पीक पाहणीसह कृषीविषयक योजनांचा लाभ घेण्याच्या प्रक्रियेतही शेतकरी ओळखपत्राची उपयुक्तता वाढत आहे. आगामी काळात सुरू होणाऱ्या 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना'साठीदेखील फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी वेळेत नोंदणी करून घ्यावी, असे जिल्हाधिकारी श्री. चव्हाण यांनी स्पष्ट केले.

पीएम-किसान सन्मान निधी योजनेचा लाभ मिळविण्यासाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी व फार्मर आयडी आवश्यक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी नोंदणी पूर्ण करून योजनेचा लाभ सुनिश्चित करावा. केवळ फार्मर आयडी नसल्यामुळे शासनाच्या विविध योजनांपासून शेतकरी वंचित राहू नयेत, यासाठी नोंदणी प्रक्रियेला गती देण्याचे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले.

फार्मर आयडी हा ई-पीक पाहणीसह केंद्र व राज्य शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी महत्त्वाचा ठरत आहे. तसेच पशुसंवर्धन विभागामार्फत सुरू करण्यात येणाऱ्या 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' योजनेसाठीही फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आला आहे. शासनाच्या योजनांचा लाभ सुलभतेने मिळावा, शेतकऱ्यांची माहिती डिजिटल स्वरूपात उपलब्ध व्हावी आणि लाभ वितरण प्रक्रिया अधिक प्रभावी व्हावी, या दृष्टीने ॲग्रीस्टॅक नोंदणी महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे अद्याप फार्मर आयडी न काढलेल्या शेतकऱ्यांनी तातडीने नोंदणी करावी, असे जिल्हाधिकारी अण्णासाहेब श्री. चव्हाण यांनी स्पष्ट केले.

तसेच रब्बी पिकांसाठी सद्यस्थितीत जायकवाडी धरणातून पाणीपुरवठा सुरू असला, तरी आगामी काळात धरणातील जलसाठा कमी होण्याची शक्यता लक्षात घेऊन पाण्याचे नियोजन करणे आवश्यक आहे. संभाव्य कडक उन्हाळा, झपाट्याने होणारे बाष्पीभवन आणि घटणारा जलसाठा यांचा विचार करून रब्बी हंगामातील पिकांसाठी शक्य होईल, तोपर्यंत सिंचनाचे आवर्तन उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येणार आहेत.

यासाठी शेतकऱ्यांमध्ये पाण्याचा काटकसरीने वापर आणि उपलब्ध जलसाठ्याचे महत्त्व याबाबत जनजागृती करण्याची गरज असल्याचेही जिल्हाधिकारी श्री.अण्णासाहेब चव्हाण यांनी सांगितले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

युवक महोत्सवातून विद्यार्थी कलावंतांच्या प्रतिभेला मिळाली झळाळी!



हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी: विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ देणारा आणि सांस्कृतिक परंपरेचा वारसा जपणाऱ्या जिल्हास्तरीय युवक महोत्सवात विद्यार्थी कलावंतांनी लोकगीत, लोकनृत्य, पथनाट्य, चित्रकला आणि काव्यवाचन अशा विविध कलाप्रकारांतून आपल्या प्रतिभेचे बहारदार दर्शन घडविले. परभणी येथे क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच युवक महोत्सवाचे आर्या लॉन्स येथे आयोजन करण्यात आले होते. महोत्सवाचे उद्घाटन मेरा युवा भारत कार्यालयाचे मुख्य समन्वयक गजानन गाडेकर, प्रणित सांगवीकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी कल्याण पोले, क्रीडा मार्गदर्शक संजय मुंढे, प्रकाश बनाटे तसेच परीक्षक प्रा. डॉ. सुरेश शेळके, प्रा. डॉ. कीर्तिकुमार मोरे, डॉ. सुनील तुरुकमाने, रवी पंडित, प्रा. अमोल गवई, वर्षा जोशी, आकांक्षा प्रभणकर आणि योगेश मगर यांच्या प्रमुख उपस्थितीत नटराज मूर्तीचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले. प्रास्ताविकात जिल्हा क्रीडा अधिकारी कल्याण पोले यांनी युवक महोत्सवाचे महत्त्व विशद केले. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव देण्यासाठी युवक महोत्सव महत्त्वाचे व्यासपीठ आहे.

माय भारत केंद्रातर्फे संविधान दिनानिमित्त 'युवा संवाद' कार्यक्रम उत्साहात संपन्न



हिंगोली : भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयांतर्गत कार्यरत मेरा युवा भारत केंद्र, हिंगोली यांच्या वतीने २६ नोव्हेंबर २०२६ रोजी संविधान दिनानिमित्त न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली येथे 'युवा संवाद' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. युवकांमध्ये भारतीय संविधान, लोकशाही मूल्ये, मूलभूत अधिकार व कर्तव्ये याविषयी जनजागृती करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. नामदेव सोळंके होते. प्रमुख अतिथी म्हणून श्री. विशाल जी. मुळे उपस्थित होते. तसेच यूथ आयकॉन विजय दराडे, स्पोर्ट्स आयकॉन गजानन आडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. डॉ. पवन वासनिक, प्रा. डॉ. अतिश कदम, माय भारत केंद्राचे प्रविण पांडे आणि भागवत बोचरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवर व युवकांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले.

परभणीत 'उमंग महोत्सवा'चे थाटात उद्घाटन तृतीयपंथीयांच्या कलागुणांना प्रोत्साहन



हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी: तृतीयपंथीय समुदायातील कलावंतांना आपली कला सादर करण्याची संधी मिळावी, त्यांना समाजात सन्मानाचे स्थान मिळावे आणि रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने परभणीत आयोजित 'उमंग महोत्सवा'चे बुधवारी (ता. २५) बी. रघुनाथ रंगमंदिर येथे उत्साहात उद्घाटन झाले. कार्यक्रमास परभणीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

उपजिल्हाधिकारी (निवडणूक) अरुणा संगेवार, जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी खांडेकर, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे विभागीय अधिकारी सचिन पाईकराव आणि महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळाच्या सहउपाध्यक्ष डॉ. सान्वी जेठवानी यांच्या प्रमुख उपस्थितीत महोत्सवाचा प्रारंभ झाला. तृतीयपंथीय समुदायातील अनेक व्यक्तींमध्ये विविध कलागुण आणि कौशल्ये आहेत. मात्र, सामाजिक स्तरावर त्यांना अनेकदा अपेक्षित संधी मिळत नाहीत. ही परिस्थिती बदलण्यासाठी आणि त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी उमंग महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून तृतीयपंथीय कलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेच्या अर्जांना मुदतवाढ

परभणी, -- राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेचा लाभ घेण्याकरिता सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी नव्याने प्रथम वर्षास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पध्दतीने प्रवेश अर्ज करण्याकरीता दि. १० डिसेंबर २०२६ रोजी पर्यंत अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.तसेच परभणी जिल्ह्यातील तालुक्यांच्या ठिकाणी असलेल्या काही व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रिया उशिरा सुरू झाल्यामुळे अनेक पात्र विद्यार्थ्यांना विहित मुदतीत योजनेसाठी अर्ज करता आले नव्हते. कोणताही पात्र विद्यार्थी या शासकीय लाभापासून वंचित राहू नये, या उद्देशाने प्रथम वर्षाच्या नवीन विद्यार्थ्यांसाठी ही मुदतवाढ देण्यात आली आहे.

संविधानाच्या मूल्यांचा जागर; विद्यार्थ्यांनी घेतला लोकशाहीचा जागर

चित्रकला, प्रश्नमंजुषा, जनजागृती रॅली अन् 'ओळख संविधानाची' नाटिकेतून संविधानाचे महत्त्व अधोरेखित



छत्रपती संभाजीनगर : संविधान हा केवळ देशाचा सर्वोच्च कायदा नसून तो प्रत्येक नागरिकाला समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाचा मार्ग दाखवणारा विचार आहे. या संविधानिक मूल्यांची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी वाळूज येथील महाराष्ट्र कला महाविद्यालय, गॅलेक्सी इंग्लिश स्कूल, पीपल्स व्होकेशनल ट्रेनिंग सेंटर तथा गॅलेक्सी डिफेन्स अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. सांस्कृतिक कार्यक्रम, जनजागृती रॅली आणि स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी संविधानाच्या विचारांचा जागर केला.

संस्थेचे अध्यक्ष सुनील वाकेकर आणि सचिव जयश्री बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य अनिल नेवगे होते. प्रमुख पाहुण्या म्हणून मुख्याध्यापिका प्रतीक्षा तांगडे, तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. रितेश राठोड आणि डॉ. देवधन धुवे उपस्थित होते.

संविधान दिनाचे औचित्य साधून संविधान जनजागृती रॅली काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करून संविधानातील मूलभूत मूल्यांचे पालन करण्याचा संदेश दिला. तसेच चित्रकला आणि प्रश्नमंजुषा स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाला व कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले.

प्रेम कारवाडे आणि विशाल वीर यांनी संविधानाच्या महत्त्वावर विचार मांडले. यावेळी प्रा. मुजीब शहा यांनी संविधानाच्या प्रास्ताविकेच्या पाच प्रती महाविद्यालयाला भेट दिल्या. प्रश्नमंजुषा स्पर्धेत यश मिळविणाऱ्या तन्वी गावडे, कोमल घुनावत, अंश घुनावत, आराध्या वीर आणि विशाल वीर या विद्यार्थ्यांना डॉ. देवधन धुवे यांच्या हस्ते भारतीय संविधानाची प्रत देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरली ती 'ओळख संविधानाची' ही नाटिका. प्रा. किरण तांबट यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतीक्षा आमदरे, खुशी पगारे, वैष्णवी सोनवणे, सर्वज्ञा भावले, कावेरी भावले आणि दिपाली दारुंटे यांनी नाटिकेतून संविधानाचे महत्त्व प्रभावीपणे सादर केले. या सादरीकरणातून संविधानातील विचार आणि मूल्ये विद्यार्थ्यांसमोर जिवंत झाली.

प्रा. रितेश राठोड यांनी संविधानातील मूल्यांचे विवेचन करताना मानवी जीवनातील त्यांचे महत्त्व स्पष्ट केले. तर डॉ. देवधन धुवे यांनी भारतीय संविधानाच्या निर्मितीचा इतिहास उलगडून सांगितला. संविधानाची जाणीव केवळ एका दिवसापुरती मर्यादित न राहता ती प्रत्येकाच्या आचरणात उतरली पाहिजे, हा संदेश या उपक्रमांतून देण्यात आला.

प्राचार्य अनिल नेवगे यांनी अध्यक्षीय समारोप केला. विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला.

संविधान दिनानिमित्त विद्यार्थ्याची शाळेला संविधानाची अनमोल भेट!

इयत्ता पाचवीतील संविधान विलास म्हस्के यांचा स्तुत्य उपक्रम

वैजापूर / प्रतिनिधी



भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून वैजापूर येथील विद्याधन इंग्लिश स्कूलमध्ये शिकणाऱ्या इयत्ता पाचवीतील विद्यार्थी **संविधान विलास म्हस्के** याने शाळेला भारतीय संविधानाची आकर्षक फ्रेम भेट देत एक प्रेरणादायी उपक्रम राबविला. वयाने लहान असतानाही देशाच्या संविधानाविषयी असलेली जाणीव, आदर आणि सामाजिक बांधिलकी यांचे दर्शन घडविणाऱ्या या विद्यार्थ्याच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

२६ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण देशभरात भारतीय संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. याच दिवसाचे महत्त्व लक्षात घेऊन संविधान विलास म्हस्के याने आपल्या शाळेतील इयत्ता पाचवी ते दहावीच्या वर्गांमध्ये लावण्यासाठी भारतीय संविधानाची आकर्षक फ्रेम शाळेला भेट देण्याचा उपक्रम हाती घेतला. विद्यार्थ्यांनी दररोज शाळेत येताना भारतीय संविधानाचे दर्शन घ्यावे, आपल्या देशाच्या संविधानाविषयी माहिती जाणून घ्यावी आणि संविधानाने दिलेल्या अधिकारांसोबतच कर्तव्यांचीही जाणीव ठेवावी, या उदात्त भावनेतून त्याने ही भेट दिली.

भारतीय संविधान हे केवळ देशाचा कारभार चालविणारे कायदेशीर दस्तऐवज नसून ते प्रत्येक भारतीय नागरिकाला समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाची शिकवण देणारे राष्ट्रीय मार्गदर्शक आहे. संविधानाच्या उद्देशिकेत नमूद असलेली ही मूल्ये विद्यार्थ्यांच्या बालमनावर लहानपणापासूनच बिंबवली गेली, तर भविष्यात जबाबदार, जागरूक आणि सुजाण नागरिक घडण्यास निश्चितच मदत होईल. याच विचारातून संविधानाची फ्रेम शाळेतील प्रत्येक वर्गात लावण्याचा हा उपक्रम विशेष महत्त्वाचा ठरत आहे. विशेष म्हणजे, शाळेला संविधानाची भेट देण्यामागे कोणताही व्यक्तिगत हेतू नसून विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी प्रेम, आदर आणि जागरूकता निर्माण व्हावी, हा त्याचा मुख्य उद्देश आहे. आजच्या काळात विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी शिक्षण न घेता सामाजिक प्रश्नांची जाणीव ठेवावी, देशाचा इतिहास, लोकशाही व्यवस्था आणि संविधानिक मूल्ये समजून घ्यावीत, असा संदेशही या छोट्याशा उपक्रमातून मिळतो. संविधान विलास म्हस्के याच्या या उपक्रमामुळे शाळेतील इतर विद्यार्थ्यांनाही सामाजिक जाणीव जोपासण्याची प्रेरणा मिळणार आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त किंवा विशेष दिनाचे औचित्य साधून शाळेसाठी आणि समाजासाठी विधायक उपक्रम राबवावेत, अशी सकारात्मक भावना या उपक्रमातून व्यक्त होत आहे. या स्तुत्य उपक्रमाबद्दल विद्याधन इंग्लिश स्कूलचे व्यवस्थापन, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच विद्यार्थ्यांनी संविधान विलास म्हस्के याचे कौतुक करून अभिनंदन केले. लहान वयात संविधानाविषयी दाखविलेली ही आस्था आणि सामाजिक बांधिलकी इतर विद्यार्थ्यांसाठीही निश्चितच प्रेरणादायी ठरणारी आहे. लहान वय, मोठा विचार! संविधानाचा सन्मान आणि संविधानिक मूल्यांचा प्रसार करण्यासाठी संविधान विलास म्हस्के याने केलेला हा छोटासा प्रयत्न खऱ्या अर्थाने संविधान दिनाच्या भावनेला साजेसा ठरला आहे.

5 किमी पांदण रस्ता स्वखर्चाने मोकळा; सोयगाव पंचायत समितीचे ठराव प्रलंबित असल्याने घोसला ग्रामस्थांचा स्वावलंबी बाणा

मातोश्री व बळीराजा पांदण रस्ता योजनांचे प्रस्ताव धूळखात; पशुधन व शेतीमालाच्या वाहतुकीसाठी

सोयगाव,दि.२६ नोव्हेंबर



सोयगाव पंचायत समितीकडे मातोश्री पांदण रस्ता आणि बळीराजा पांदण रस्ता योजनांसाठी दोन वेळा ठराव सादर करूनही अद्याप मंजुरी मिळालेली नसल्याने घोसला येथील शेतकऱ्यांनी अखेर शासकीय प्रतीक्षेला फाटा देत सुमारे ५ किलोमीटर लांबीचा पंज्यात्तर मियां पांदण रस्ता स्वखर्च आणि श्रमदानातून तयार केला आहे. प्रशासनाच्या या उदासीनतेविरोधात शेतकऱ्यांनी स्वावलंबनाचा मार्ग निवडत यंत्रणेला जणू जाग आणून दिली आहे.

घोसला शिवारातील या महत्त्वाच्या पंज्यात्तर मियां पांदण रस्त्यासाठी मातोश्री आणि बळीराजा पांदण रस्ता योजनेंतर्गत काम व्हावे म्हणून सोयगाव पंचायत समितीकडे दोन वेळा रीतसर ठराव देण्यात आले होते. तसेच रस्त्यांना नंबर मिळावा म्हणून यापूर्वी अनेकदा अभियंता यांनी पाहणीही केली. मात्र, अद्याप रस्त्याला नंबर मिळालेला नाही आणि दोन्ही योजनांच्या मंजुरीची प्रतीक्षा कायम असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

घोसला गावातील पशुधनाची दररोजची ये-जा याच मुख्य पंज्यात्तर मियां पांदण रस्त्याने होते. सुमारे ५ किमीचा हा रस्ता खड्डेमय आणि अतिखराब झाल्याने पशुधन सांभाळताना, शेतात जाणे-येणे करताना आणि तयार झालेला शेतमाल घरी आणताना शेतकऱ्यांना मोठी कसरत करावी लागत होती. त्यातच संभाव्य दुष्काळाची चाहूल लागल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली होती.

या सर्व अडचणींवर मात करत ग्रामस्थांनी व शेतकऱ्यांनी एकत्र येत ट्रॅक्टर-ट्रॉली आणि जेसीबीच्या साहाय्याने माती टाकून व सपाटीकरण करून रस्ता दुरुस्त केला. या स्वखर्च आणि श्रमदानाच्या कामात सामाजिक कार्यकर्ते किशोर पाटील, गोरखभाऊ चव्हाण, भूषण बावस्कर, देवा बावस्कर, भूषण वाघ, कल्पेश वाघ यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी पुढाकार घेतला.

"शासकीय योजना केवळ कागदावरच राहतात आणि प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाहीत, याचे हे जिवंत उदाहरण आहे. सोयगाव पंचायत समितीकडे वारंवार ठराव देऊन आणि पाहणी होऊनही मंजुरी मिळाली नाही, म्हणून आम्हाला स्वखर्चातून आणि श्रमदानातून ५ किमीचा हा रस्ता करावा लागला," असे सामाजिक कार्यकर्ते किशोर पाटील यांनी सांगितले.

पांदण रस्ते हे शेतीच्या अर्थकारणाची आणि पशुधनाच्या दळणवळणाची जीवनवाहिनी आहेत. सोयगाव पंचायत समिती व प्रशासनाने या प्रकाराची तातडीने दखल घेऊन प्रलंबित ठराव व योजनांना मंजुरी द्यावी आणि कष्टकरी शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात संविधान गौरव दिन उत्साहात साजरा

प्रमुख वक्ते डॉ. लेखचंद मेश्राम यांचे संविधानाच्या मूल्यांवर मार्गदर्शन; 26/11 च्या शहीद वीरांना श्रद्धांजली

सोयगाव,दि.२६ नोव्हेंबर - अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने संविधान गौरव दिनानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार होते. प्रमुख वक्ते म्हणून राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. लेखचंद मेश्राम उपस्थित होते, तर प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक पारधे यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. यावेळी उपस्थित मान्यवर, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांप्रती आपली बांधिलकी व्यक्त केली. त्यानंतर २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबई येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या शहीद वीर जवानांना व नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



प्रमुख वक्ते डॉ . लेखचंद मेश्राम यांनी आपल्या व्याख्यानातून भारतीय संविधानाची निर्मिती, संविधानाचे महत्त्व, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान निर्मितीतील योगदान तसेच संविधानाने नागरिकांना दिलेले मूलभूत अधिकार अधिकार आणि कर्तव्ये यांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. संविधानातील मूल्यांचे पालन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असून, विद्यार्थ्यांनी संविधानाचा अभ्यास करून लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांनी भारतीय संविधान हे देशाच्या लोकशाही व्यवस्थेचा मजबूत आधारस्तंभ असून, प्रत्येक नागरिकाने संविधानाचा आदर करून त्यातील मूल्ये आपल्या जीवनात अंगीकारावीत, असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमासाठी डॉ. शत्रुघ्न भोरे, डॉ. उल्हास पाटील, डॉ. सुभाष पाटील, डॉ. प्रमोद पवार, डॉ. ज्ञानबा भगत, डॉ. शंतनू चव्हाण, डॉ. रमेश अवताडे, डॉ. सुशील जावळे यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुनील चौधरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. मनोजकुमार चोपडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. गजानन शिरसागर, कुणाल गव्हाणे आणि राजेंद्र राठोड यांनी विशेष परिश्रम घेतले.

भगवती विद्यालय बिडकीन ता.पैठण येथे संविधान दिन: साजरा



बिडकीन दि २६ नांव्हेबर : भगवती विद्यालय बिडकीन ता.पैठण जिल्हा छत्रपतीसंभाजीनगर येथे संविधान दिन: साजरा करण्यात आला.महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.शाळेचे मुख्याध्यापक रक्टेसर अध्यक्ष स्थानी होते, श्रीधर जऱ्हाड, कमलाकर काळे, अनिता कांबळे, विश्रांती हाके मॅडम, सुनिल पवार, आप्पासाहेब किसवे, आशुतोष झारगड शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होत.श्रीधर जऱ्हाड यांनी प्रास्ताविक केले व सुनिल पवार यांनी आभार मानले. रक्टेसर यांनी मार्गदर्शन केले. कमलाकर काळे यांनी संविधान वाचन केले ,सामुहिक संविधान वाचन केले. विदयार्थी उपस्थित होते

ब्लु व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये संविधान दिन उत्साहात साजरा



बिडकीन दि २६ नांव्हेबर : पैठण तालुक्यातील बिडकीन येथील ब्लु व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये गुरुवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२६ रोजी भारतीय संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे शिक्षक रमण काकडे सर यांच्या हस्ते भारतीय संविधानाचे शिल्पकार, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाचा इतिहास, संविधान निर्मितीची प्रक्रिया, नागरिकांचे मूलभूत अधिकार व कर्तव्ये तसेच लोकशाही, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या संविधानातील महत्त्वपूर्ण मूल्यांविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी शाळेमध्ये भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन व संविधानाचे पठण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सामूहिकरीत्या संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करून भारतीय संविधानाप्रती आदर, निष्ठा आणि बांधिलकी व्यक्त केली. यावेळी शाळेचे शिक्षक दत्तात्रय चेडे सर यांनी विद्यार्थ्यांना संविधान दिनाचे महत्त्व विशद करून संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिलेले अधिकार, कर्तव्ये आणि लोकशाही व्यवस्थेतील नागरिकांची भूमिका याविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी जागरूकता निर्माण होण्यासोबतच राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक समता आणि बंधुतेची भावना रुजविण्याचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे संविधान दिन साजरा



सोयगाव,दि.२६ नोव्हेंबर - प्राथमिक शाळा रामजीनगर येथे २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने भारतीय संविधानाच्या प्रतिमेचे पूजन करून संविधानाबद्दल आदर व्यक्त करण्यात आला.

तसेच विद्यार्थ्यांच्या सहभागातून भारतीय संविधानाची प्रतिमा घेऊन गावातून प्रभातफेरी काढण्यात आली. या प्रभातफेरीच्या माध्यमातून संविधानातील मूल्ये, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय यांचा संदेश देण्यात आला. तसेच नगरसेवक गजानन कुडके यांच्या उपस्थितीत मुलांना संविधान दिन निमित्त संविधान प्रतिमा वाटप केल्या,या प्रसंगी गजानन कुडके, भगवान इंगळे, विनोद इंगळे, रघुनाथ कोळी, एकनाथ इंगळे मुख्याध्यापक रघुनाथ काटोले व गोपाल चौधरी उपस्थित होते.

ब्रह्मचारी देव नारायण शरणजी महाराज यांचे निधन



बिडकीन, दि. २६ नोव्हेंबर : छत्रपती संभाजीनगर-पैठण रोडवरील बिडकीन येथील धर्माई पूल परिसरातील मारुती मंदिरात भक्ती, साधना आणि ईश्वरसेवेत तल्लीन राहणारे गुरुवर्य ब्रह्मचारी देव नारायण शरणजी महाराज यांचे बुधवार, दि. २५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.४५ वाजता वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता धर्माई पूल येथील मारुती मंदिराशेजारी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी बिडकीनसह परिसरातील भाविक, भक्त आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संविधानाच्या मूल्यांची विद्यार्थ्यांना ओळख; हरसूल मनपा शाळेत अभिवादन कार्यक्रम

हरसूल मनपा शाळेत संविधान दिन उत्साहात; सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळाकडून संविधान उद्देशिकेची प्रतिमा भेट

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : संविधान म्हणजे केवळ कायद्याचे पुस्तक नसून देशातील प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार देणारा आणि समाजाला एकतेच्या धाग्यात बांधणारा विचार आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही संविधानाने दिलेली मूल्ये विद्यार्थ्यांच्या मनावर बालवयातच रुजली, तर भविष्यात जबाबदार, जागरूक आणि संवेदनशील नागरिकांची पिढी घडू शकते. याच विचारातून हरसूल येथील महानगरपालिका शाळेत संविधान दिनानिमित्त अभिवादन व प्रबोधन कार्यक्रम उत्साहात पार पडला.



सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळाच्या श्री गुरुजी चल चिकित्सालय या प्रकल्पांतर्गत आयोजित कार्यक्रमात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच संविधानाच्या उद्देशिकेच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून संविधानातील मूल्यांप्रती आदर व्यक्त करण्यात आला. यावेळी मंडळाच्या वतीने शाळेला संविधानाच्या उद्देशिकेची प्रतिमा भेट देण्यात आली. शाळेतील विद्यार्थ्यांना दररोज संविधानाच्या मूलभूत विचारांची आठवण व्हावी आणि त्यातून त्यांच्यामध्ये लोकशाहीविषयी जाणीव निर्माण व्हावी, हा या भेटीमागील महत्त्वाचा उद्देश होता.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते नितीन दांडगे यांनी विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व समजावून सांगितले. ते म्हणाले, "भारतीय संविधान हा आपल्या लोकशाहीचा आत्मा आहे. संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार दिला असून जात, धर्म, भाषा, लिंग किंवा आर्थिक परिस्थितीच्या आधारावर कोणताही भेदभाव असू नये, हा व्यापक विचार देशाला दिला आहे. संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही केवळ उद्देशिकेतील शब्द नसून ती आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनली पाहिजेत."

पुढे बोलताना नितीन दांडगे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून देशातील वंचित, शोषित आणि दुर्बल घटकांनाही सन्मानाने जगण्याची संधी मिळावी, यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. शिक्षण हे परिवर्तनाचे प्रभावी साधन असून विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक प्रगती न करता संविधानाने सांगितलेली सामाजिक जबाबदारीही समजून घेतली पाहिजे. दुसऱ्याच्या अधिकारांचा सन्मान करणे, कोणावरही अन्याय न करणे, भेदभावाला थारा न देणे आणि सर्वांशी समानतेने वागणे हीच संविधानाच्या विचारांची खरी अंमलबजावणी आहे.

विद्यार्थ्यांनी संविधानाची उद्देशिका वाचण्याबरोबरच तिचा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य म्हणजे मनमानी नव्हे, तर जबाबदारीने विचार आणि अभिव्यक्ती करण्याचा अधिकार; समता म्हणजे प्रत्येकाला समान संधी; तर बंधुता म्हणजे समाजातील प्रत्येक व्यक्तीला आपले मानून एकोप्याने जगणे. या मूल्यांमुळेच भारताची लोकशाही अधिक मजबूत होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी लहानपणापासूनच संविधानाचा अभ्यास करून चांगले नागरिक बनण्याचा संकल्प करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

संविधान उद्देशिकेची प्रतिमा शाळेला भेट देणे हा केवळ औपचारिक उपक्रम नसून शाळेच्या माध्यमातून संविधानाचा विचार पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. शाळेच्या परिसरात संविधानाची उद्देशिका उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांना तिचे वाचन, चिंतन आणि त्यातील मूल्यांचे आचरण करण्याची प्रेरणा मिळणार आहे. या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक सपकाळ सर, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

परभणीत अत्याधुनिक 'आधार सेवा केंद्राचे' जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटन

नागरिकांना एकाच छताखाली सर्व आधार सेवा उपलब्ध

हिंदू प्रकाश वार्ता/प्रतिनिधी



परभणी,: परभणी जिल्ह्यातील नागरिकांच्या सुविधेसाठी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) मार्फत स्थापन करण्यात आलेल्या अत्याधुनिक 'आधार सेवा केंद्राचे' आज जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

परभणी शहरातील मुरली हाईटस, ज्ञानेश्वर नगर रोड, लोकमान्य नगर येथे हे केंद्र कार्यान्वित झाले आहे. आता आधार करिता येणाऱ्या अडचणी किंवा तक्रारी निवारणासाठी मुंबई प्रादेशिक कार्यालयास जाण्याची गरज नाही.

या उद्घाटन सोहळ्यास निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, युआयडीएआयचे सहाय्यक व्यवस्थापक कुलदीप सिंग गहलोद, आधार सेवा केंद्र परभणीचे केंद्र व्यवस्थापक दौलत वाघमोडे, बीएलएस इंटरनॅशनलचे निलेश शहाणे , हभप अच्च्युत महाराज दस्तापुरकर, ऑपरेशन व्यवस्थापक नरेंद्र आडगावकर व केंद्र कर्मचारी यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्री. चव्हाण म्हणाले की, परभणी जिल्ह्यात युआयडीएआय मार्फत आधार सेवा केंद्र सुरू करण्यात आले असून, यामुळे जिल्ह्यातील नागरिकांना आधार नोंदणी तसेच आधारमधील आवश्यक अद्ययावत बदल करण्याच्या सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. नागरिकांच्या सोयीसाठी ही केंद्र आठवड्यातील सातही दिवस सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत कार्यरत राहणार आहेत.

विशेषतः ५ ते १७ वर्षे वयोगटातील बालकांचे Mandatory Biometric Update (MBU) करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. वाढत्या वयानुसार बालकांच्या बायोमेट्रिक माहितीमध्ये बदल होत असल्याने हाताच्या बोटांचे ठसे, डोळ्यांच्या बुबुळांचे स्कॅन आणि छायाचित्र अद्ययावत करणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया वेळेत पूर्ण केल्यास आधार आधारित शासकीय योजना, शिष्यवृत्ती, शैक्षणिक प्रवेश, बँकिंग व इतर सेवांचा लाभ घेताना संभाव्य अडचणी टाळण्यास मदत होईल.

या अनुषंगाने जिल्ह्यातील शाळा, अंगणवाड्या आणि विशेष शिबिरांच्या माध्यमातून एमबीयु मोहीम राबविण्यात येणार आहे. पालकांनी आपल्या पाल्यांचे बायोमेट्रिक अद्ययावतीकरण वेळेत करून घ्यावे. तसेच परभणी जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या आधार सेवा केंद्र सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले.

केंद्राचे प्रमुख वैशिष्ट्ये आणि उपलब्ध सेवा

एकाच छताखाली सर्व सेवा - नवीन आधार नोंदणी (बाल आधार व प्रौढ), नाव, पत्ता, जन्मतारीख, लिंग, मोबाईल क्रमांक व ई-मेल अद्ययावत करणे, बायोमेट्रिक अपडेट (फोटो, बोटांचे ठसे, बुबुळे), तसेच ओळखीचा व पत्त्याचा पुरावा (POI/POA) अद्ययावत करण्याची सोय येथे उपलब्ध आहे. *सुटसुटीत आणि पारदर्शक कार्यप्रणाली* - नागरिकांचा वेळ वाचवण्यासाठी येथे टोकन प्रणाली, हेल्प डेस्क, कागदपत्र पडताळणी (Verifier), शुल्क भरणा काउंटर आणि ECMP ऑपरेटर अशी शिस्तबद्ध चार-टप्प्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. *विशेष व समावेशक उपक्रम* - ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींसाठी येथे विशेष बसण्याची व मार्गदर्शनाची सोय आहे. तसेच दिव्यांगांचे आधार काढणे, निलंबित किंवा बंद पडलेले आधार (White List प्रक्रियेद्वारे) पुन्हा सुरू करणे आणि शाळा व शासकीय कार्यक्रमांमध्ये विशेष कॅम्प घेणे अशी विशेष कार्ये या केंद्रामार्फत केली जातील.

ऑनलाइन अपॉइंटमेंट सुविधा - नागरिकांना रांगेत न थांबता सेवा घेता यावी यासाठी **[https://appointments.uidai.gov.in](https:**//appointments.uidai.gov.in) या संकेतस्थळावरून विनामूल्य ऑनलाइन अपॉइंटमेंट बुक करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

संविधानाचा सन्मान, लोकशाहीचा अभिमान! शिवना येथे संविधान दिन उत्साहात साजरा

राजकीय नेते, पत्रकार, व्यापारी व सामाजिक कार्यकर्त्यांना संविधानाची फ्रेम भेट; अनोख्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक

सिल्लोड : तालुक्यातील शिवना येथे भारतीय संविधान दिन मोठ्या उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. शिवना ग्रामपंचायत कार्यालय तसेच बसस्थानक परिसरात संविधान दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूलभूत मूल्यांचे स्मरण करण्यात आले.



संविधान दिनाचे औचित्य साधून शिवना येथील सर्व राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार बांधव तसेच व्यापारी बांधवांना संविधान दिनाची आकर्षक फ्रेम भेट देऊन संविधानाप्रती आदर व्यक्त करण्यात आला. समाजातील सर्व घटकांना एकत्र आणत संविधानाचा सन्मान करण्याचा हा उपक्रम विशेष ठरला. या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.

या कार्यक्रमाला पंचायत समिती सदस्य शेख सलीम, जिल्हा परिषद सदस्य राजूबाबा काळे, माजी सरपंच डॉ. सलमान खान, गणेश सपकाळ, माजी सरपंच इस्माईल कुरेशी, अजीम कुरेशी, शामराव होळकर, संतोष जगताप, विनोद जगताप, निलेश जगताप, विनायक काटकर, कासीम शेख, अन्सार चाऊस आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी गावातील नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी भारतीय संविधानाचे महत्त्व अधोरेखित करत संविधानाने प्रत्येक भारतीय नागरिकाला समानतेचा अधिकार, स्वातंत्र्य आणि न्याय दिला असल्याचे सांगितले. संविधानामुळेच देशाची लोकशाही व्यवस्था मजबूत झाली असून, प्रत्येक नागरिकाने संविधानातील मूल्यांचा आदर करून त्यांचे पालन करणे आवश्यक आहे, असे मत व्यक्त करण्यात आले.

श्री क्षेत्र आपेगाव येथे संत ज्ञानेश्वर महाराज या तीर्थस्थळी जयसिंगराव गायकवाड पाटील यांना देऊन केले सन्मानित

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

खुलताबाद प्रतिनिधी : संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या श्री क्षेत्र आपेगाव ता पैठण जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथे, मोठ्या भक्तीमय वातावरणात श्री संत ज्ञानेश्वर महाराज जन्मसंस्थान असलेल्या ठिकाणी आयोजित 'संत ज्ञानोबाराय तृतीय राज्यस्तरीय साहित्य संमेलनात', दि २४ नोव्हेंबर २०२६ रोजी, महाराष्ट्राच्या राजकीय, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व, माजी केंद्रीय शिक्षण व खान राज्यमंत्री तथा मा खासदार श्री जयसिंगराव (काका) गायकवाड पाटील यांना 'सन्मानमुद्रा' प्रदान करून गौरविण्यात आले.



ही सन्मानमुद्रा म्हणजे त्यांच्या प्रदीर्घ लोकसेवेचा, धार्मिक शैक्षणिक योगदानाचा आणि समाजहिताच्या कार्याचा गौरव करणारी कर्तृत्वाचा गौरव करण्यात आला

व या साहित्य सोहळ्यामध्ये ५१ प्रख्यात कीर्तनकार अध्यात्मिक कार्यात नेहमी सहभाग असणाऱ्या महाराष्ट्रातील ज्ञानरत्न पुरस्कार्थीना काकांच्या ह. भ. प. अध्यात्म विवेकी ज्ञानेश्वर महाराज कोल्हापूरकर (दादा) यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. यावेळी धार्मिक आध्यात्मिक राजकीय विविध क्षेत्रातील मान्यवर प्रमुख्याने उपस्थिती होती

सोयगावच्या व्यावसायिकांना वाऱ्यावर सोडणार नाही; दहा दिवसांत प्रश्न मार्गी लावणार : आ. अब्दुल सत्तार

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी



सोयगाव,दि.२६ नोव्हेंबर

सोयगाव शहरातील अतिक्रमण निष्कासन मोहिमेमुळे बाधित झालेल्या व्यावसायिकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला असून, या व्यावसायिकांना वाऱ्यावर सोडणार नाही. येत्या दहा दिवसांत त्यांच्या प्रश्नावर निश्चितपणे मार्ग काढून कोणावरही अन्याय होऊ देणार नाही, अशी ठाम ग्वाही सिल्लोड-सोयगाव मतदारसंघाचे आमदार अब्दुल सत्तार यांनी दिली.

सोयगाव येथील अतिक्रमण निष्कासन मोहिमेत बसस्थानक परिसरातील व्यावसायिकांची दुकाने हटविण्यात आल्याने अनेकांचा रोजगार पूर्णपणे बंद झाला आहे. त्यामुळे व्यावसायिकांसमोर उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, त्यांच्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ येण्याची शक्यता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर बाधित व्यावसायिकांनी मंगळवार, दि. २४ नोव्हेंबर रोजी सिल्लोड येथील शिवसेना भवनात आमदार अब्दुल सत्तार यांची भेट घेऊन आपली व्यथा मांडली.

व्यावसायिकांची समस्या जाणून घेताच आमदार अब्दुल सत्तार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक सूचना दिल्या. तसेच फर्दापूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहात व्यावसायिकांची बैठक घेऊन त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. यावेळी कोणतेही राजकारण अथवा जातिभेद न करता सर्वांना समान न्याय दिला जाईल. कोणावरही अन्याय होणार नाही. व्यावसायिकांना वाऱ्यावर सोडणार नाही, येत्या दहा दिवसांत तुमचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले.

शहराचा विकास आणि वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी सोयगाव नगरपंचायतीच्या वतीने अतिक्रमण निष्कासन मोहीम राबविण्यात आली होती. मात्र, या मोहिमेमुळे बसस्थानक परिसरातील अनेक व्यावसायिकांचा व्यवसाय बंद पडला होता. त्यामुळे त्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न निर्माण झाला होता. या परिस्थितीत आमदार अब्दुल सत्तार यांनी व्यावसायिकांची व्यथा समजून घेत तातडीने हस्तक्षेप केल्याने व्यावसायिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी उपस्थित व्यावसायिकांनी आमदार अब्दुल सत्तार यांच्या समर्थनार्थ घोषणाही दिल्या.

यावेळी शिवसेना तालुका प्रमुख धरमसिंग चव्हाण, नगरपंचायत गटनेते अक्षय काळे, नगरसेवक तथा शहरप्रमुख संतोष बोडखे, राजेंद्र दुतोंडे, कदीर शहा, हर्षल काळे, दिपक पगारे, राजू माळी, किशोर मापारी, रऊफ देशमुख, विशाल चव्हाण त्यांच्यासह बाबू शहा, महेश मानकर, विजय पगारे, गणेश गायकवाड, दिलीप शिंदे, आकाश वरकड, दिलीप सुरडकर, गजानन सोनवणे, भावडू गाडेकर, राम सोहनी, केयूर पानसर, महेश राऊत, महेश सोहनी, रवींद्र बावस्कर, राहुल सोनवणे, दत्तू रोकडे, सलीम पठाण, खंडू पाटील आदींसह बाधित व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

43 वर्षांनंतर फुलला मैत्रीचा मळा; श्रीनाथ विद्यालयात 1983 च्या बॅचचा अविस्मरणीय स्नेहमिलन सोहळा!

पैठण (प्रतिनिधी): येथील श्रीनाथ विद्यालयातील 1983 च्या दहावी बॅचचा स्नेहमिलन आणि गुरुपूजन सोहळा रविवार 22 नोव्हेंबर 2026 रोजी विद्यालयाच्या प्रांगणात अत्यंत उत्साहात, जिव्हाळ्याच्या आणि भावनिक वातावरणात पार पडला. शाळा सोडून तब्बल 43 वर्षे उलटल्यानंतर एकत्र आलेल्या 65 माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी जुन्या आठवणींना उजाळा देत गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.



43 वर्षांनंतर सर्वांना एका धाग्यात गुंफण्याचे शिवधनुष्य आयोजक अब्दुल शेख, एकनाथ पोपळघट आणि राजू परदेशी यांनी यशस्वीरीत्या पेलले. त्यांच्या अथक परिश्रमाला आणि श्रीनाथ हायस्कूलचे प्राचार्य श्री. शिवाजी पठाडे यांनी शाळेची वास्तू उपलब्ध करून दिल्याने या सोहळ्याला मूर्त रूप आले.

छत्रपती संभाजीनगर, पुणे , बीड ,जालना, अहिल्यानगर, धाराशिव, बुऱ्हाणपुर अशा विविध ठिकाणांहून तब्बल 65 माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी या सोहळ्यासाठी एकत्र आले . विजय रोडे, प्रा. विवेक वैद्य, उमेश सोनवणे, राजेंद्र पठाडे, विजय भालेराव, संजय खांडेकर, बबन डाके, संतराम जाधव, सूर्यकांत काळे, श्रीमती जमुना ताई गारदे, सौ.राणीताई नलावडे, सौ . निर्मलाताई बारसे , बाबासाहेब काळे , प्रकाश वाघे , शेख सलीम यांच्यासह सर्व मित्रांनी विशेष परिश्रम घेतले आणि अनेक मित्रांनी सहकुटुंब उपस्थित राहून कार्यक्रमाला कौटुंबिक आपुलकीची जोड दिली.

सकाळी ठीक 11.30 वाजता उपस्थित गुरुजनांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन आणि प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी कै. बी. जी. धस सर, कै. एम. डी. धस सर, कै. आर. डी. धस सर, कै. गिरीगे सर तसेच दिवंगत विद्यार्थी मित्रांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या सोहळ्याला श्री. राजपूत सर, श्री. परळकर सर, सौ. भालेराव मॅडम, श्री. ढेपे सर, श्री. गायकवाड सर, श्री. गरड सर, श्री. रावस सर, श्री. एस. आर. पाटील सर आणि श्री. गोरे सर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना उत्तम आरोग्य, योगसाधना, श्रम, नैतिकता आणि वयाची मर्यादा न मानता सतत कार्यशील राहण्याचा मौलिक उपदेश केला. प्रकृती साथ देत नसतानाही परळकर सरांनी विद्यार्थ्यांच्या आग्रहाखातर मधुर गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपल्या ओंजळीत फुले घेऊन गुरुजनांच्या मस्तकावर पुष्पवृष्टी करत आगळेवेगळे गुरुपूजन केले; विद्यार्थ्यांचे हे प्रेम पाहून अनेक शिक्षकांचे डोळे आनंदाश्रूंनी पाणावले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य श्री. शिवाजी पठाडे यांनी विद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेत माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या विकासासाठी योगदान देण्याचे आवाहन केले. या आवाहनाला तत्काळ प्रतिसाद देत 1983 च्या बॅचने शाळेच्या विकासासाठी एक विशेष समिती स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण ठराव मंजूर केला.

मैत्रीचे नाते असेच कायम राहो! : या स्नेहमिलनाने एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की, 43 वर्षांचा काळ गेला, केस पांढरे झाले, चेहऱ्यावर वयाच्या खुणा उमटल्या, प्रत्येकाच्या आयुष्यात अनेक बदल झाले; पण मित्रांमधील प्रेम, आपुलकी आणि मैत्रीचा ओलावा मात्र अजूनही तसाच आहे.शाळेच्या आठवणींना पुन्हा उजाळा देताना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद, एकमेकांना भेटण्याची उत्सुकता आणि पुन्हा भेटण्याचे दिलेले आश्वासन या सर्व गोष्टी या कार्यक्रमाचे खरे यश म्हणावे लागेल.

प्रा. विवेक वैद्य यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले. शेवटी श्री. गोरे सरांच्या कडक शालेय शिस्तीतील आदेशानुसार सर्वांनी एका सुरात राष्ट्रगीत गायले. त्यानंतर स्नेहभोजन, मनमोकळ्या गप्पा आणि फोटोसेशनने या अविस्मरणीय सोहळ्याची सांगता झाली.

लोकनृत्य स्पर्धेत जालना येथील कामगार कल्याण भवन प्रथम



छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागांतर्गत महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, छत्रपती संभाजीनगर गटाच्या वतीने आयोजित लोकनृत्य स्पर्धा २०२६-२७ चा पारितोषिक वितरण समारंभ गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी उस्मानपुऱ्यातील ललित कला भवनमध्ये उत्साहात पार पडला. अध्यक्षस्थानी देवन करबाडे, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रमोदकुमार पाटील उपस्थित होते. यावेळी परीक्षक म्हणून राहुल अंकुशे, गौरव शिरसाट व दिव्या गुप्ता उपस्थित होते.

प्रास्ताविक महाराष्ट्र का. क. मंडळाचे प्रभारी सहायक कल्याण आयुक्त भालचंद्र जगदाळे यांनी केले. परीक्षकांच्या वतीने दिव्या गुप्ता यांनी मनोगत व्यक्त केले, तर प्रमुख पाहुणे प्रमोदकुमार पाटील यांनी कामगार कल्याण मंडळाच्या विविध उपक्रमांचे आणि सांस्कृतिक स्पर्धांमधून कामगारांच्या कलागुणांना मिळणाऱ्या व्यासपीठाचे महत्त्व विशद केले. अध्यक्षीय मनोगतात देवन करबाडे यांनी सहभागी कलाकारांचे कौतुक करून अशा उपक्रमांमुळे सांस्कृतिक परंपरा जतन होण्यास मदत होते, असे सांगून निकालाचे वाचन केले. विजेत्या संघांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. यामध्ये प्रथम क्रमांक - का. क. भवन, जालना. द्वितीय क्रमांक - का. क. उपकेंद्र, सहारा कॉलनी आणि तृतीय क्रमांक का. क. भवन, कोतवालपुरा यांनी पटकाविला.

सूत्रसंचालन कल्याण निरीक्षक विजय अहिरे यांनी, तर आभार प्रदर्शन कल्याण निरीक्षक अजय निकम यांनी केले. यावेळी विविध केंद्रांतील कलाकार, कामगार प्रतिनिधी व मान्यवरांच्या उपस्थितीत सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911